


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे | अंक : २५७ वा | बुधवार दि २४ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# न्यायालयाच्या तोंडावर बुलडाण्यात भूमाफियागिरीचा उन्माद!

## ओएसडीच्या छत्रछायेत शेतजमीन बळकावण्याचा धक्कादायक प्रकार!

**भाग ८**

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात शासकीय पदाचा गैरवापर, महसूल यंत्रणेशी संगनमत आणि पोलीस यंत्रणेची रहस्यमय उदासीनता यांच्या बळावर न्यायप्रविष्ट शेतजमीन हडप करण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.ना.संजय शिरसाट यांचा ओएसडी म्हणून कार्यरत असलेल्या सिध्दार्थ भंडारे याने आपल्या मावसभाऊ महेंद्र नारायण राऊत यांच्या नावाने १४ एक्कर सामुहिक न्यायप्रविष्ठ असलेली वादग्रस्त शेतीची खरेदी दाखवून संपूर्ण यंत्रणेलाच आव्हान दिले आहे. संबंधित शेतीवर बुलडाणा ग्रामसेवा सहकारी संस्था र.नं.५५४ कडे तारण असताना देखील दुय्यम निबंधक यांनी संगनमताने खरेदीदस्त नोंदविल्याचा आरोप आहे.यावर हरकत व अपील प्रलंबित असताना,बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांनी नियमबाह्य दिलेल्या केवळ सातबाऱ्यावर नाव आले म्हणून महेंद्र राऊत याने शासकीय मोजणी व पोलीस बंदोबस्तासाठी अर्ज केला.मात्र प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने महसूल प्रशासन व जिल्हा पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट नकार दिला. तरीही दि.0२ जुलै २०२५ रोजी दुपारी १ वाजता जेसीबी, ट्रक, ट्रॅक्टर, २४ जणांचा जमाव व बाऊंसर घेऊन शेतात जबरदस्ती घुसखोरी करण्यात आली. पेरलेल्या पिकांची नासधूस,सिमेंटचे खांब, तार कंपाऊंड व टिनशेड उभारून थेट अतिक्रमण करण्यात आले.विशेष म्हणजे याबाबत तक्रार देण्यासाठी गेलेल्या पीडित राहुल तारे परीवार शेतकऱ्याची तक्रार ग्रामीण पोलीस स्टेशनने घेण्यास टाळाटाळ केली. डीवायएसपी स्तरावर हस्तक्षेप होऊनही आजतागायत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. शासकीय पदाच्या जोरावर आप्तेष्टांच्या नावे अफाट चल अचल संपत्ती जमवून भूमाफियागिरी करणाऱ्या सिध्दार्थ भंडारेवर कठोर कारवाई होणार की पुन्हा एकदा ङ्गसत्ताधाऱ्यांचा माणूसफ वाचणार? असा सवाल आता सर्वसामान्य बुलढाणेकर विचारत आहेत. नियमबाह्य खरेदी व अर्धवट दस्तावेज १४ एक्कर जमीन प्रकरणात जो कोणी दोषी आढळला त्याची महसूल विभाग व पोलीस प्रशासनाने उच्चस्तरीय चौकशी करून पीडित राहुल तारे यांना न्याय मिळवून द्यावा व दोषींवर फोजदारी स्वरूपाचे गुन्हे करावे अशी मागणी पीडित तारे परीवार प्रशासनाकडे करीत आहे जो पर्यंत पीडित तारे परिवाराला न्याय मिळत नाही तो पर्यंत आम्ही त्यांनी दिलेल्या प्रत्येक पत्रव्यवहाराची




बातमी लेखणीतून संबंधित प्रशासनाकडे मांडत राहू

अजून बरेच काही पुढील भागात...

# बनावट कागदपत्रांनी १५ कोटींचा घोटाळा निलेश इन्फ्रास्ट्रक्चरवर गुन्हा दाखल!



**जनसंचलन/शेगाव**

शासनाची कोट्यवधींची निविदा बनावट कागदपत्रांच्या आधारे मिळवून सरकारी यंत्रणेलाच गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिगाव प्रकल्प अंतर्गत जिनाव धरणाच्या खालील बाजूस देखभाल व दुरुस्तीसाठी रस्ता बांधकामाच्या तब्बल १५ कोटी ६३ लाख रुपयांच्या निविदेत मे. निलेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नंदुरबार यांनी खोटे अनुभव प्रमाणपत्र सादर केल्याचे स्पष्ट झाले असून, याप्रकरणी भादंवि कलम ४२०, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे, निविदेत पात्र ठरण्यासाठी चाळीसगाव नगरपरिषदेकडून मिळाल्याचे दर्शविलेले अनुभव प्रमाणपत्र पूर्णतः बनावट असल्याचे नगरपरिषदेच्या अधिकृत खुलाशातून सिद्ध झाले आहे. संबंधित प्रमाणपत्राची कोणतीही नोंद कार्यालयीन अभिलेखात नसल्याचे मुख्याधिकाऱ्यांनी लेखी स्वरूपात मान्य केले आहे. तरीही या खोट्या कागदपत्रांच्या आधारे निविदा मंजूर होऊन कार्यारंभ आदेश काढण्यात आला आणि काम पूर्णही करण्यात आले. तक्रारदार मंगेश मानकर यांनी माहिती अधिकारातून मिळवलेल्या कागदपत्रांमुळे हा घोटाळा उघडकीस आला. विशेष म्हणजे, निविदेसोबत सादर केलेल्या सत्यप्रतिज्ञापत्रात खोटी माहिती दिल्यास कायदेशीर कारवाईस पात्र राहीन, असे स्पष्ट नमूद असतानाही ठेकेदाराने जाणिवपूर्वक शासनाची फसवणूक केल्याचा आरोप आहे. जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयानुसार अशा प्रकरणात ✻फौजदारी कारवाई बंधनकारक✻ असताना, आतापर्यंत संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. इतका मोठा गैरप्रकार होऊनही यंत्रणा झोपेत होती का? की कुणाच्या वरदहस्तामुळे हा प्रकार घडला? असे संतप्त सवाल आता उपस्थित होत आहेत. या घोटाळ्यामुळे सरकारी निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, दोषींवर कठोर कारवाईची जोरदार मागणी होत आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिंदगी फिर भी यहां खूबसूरत है



आम्हाला जाणवलेलं आसामी लोकांचं वेगळेपण म्हणजे इथे भांडण झालं तरी सहसा आवाज चढवून कुणी बोलत नाही, किंबहुना असं मोठ्याने बोललेलं अपमानास्पद मानलं जातं. पण इथे व्यसनाधीनतेचे प्रमाण जास्त आहे. तंबाखू न खाणारी व्यक्ती सापडणं, मुश्किल. त्यामुळे महाराष्ट्रातल्या शहरांच्या मानाने गुवाहाटी शहर अस्वच्छ वाटू शकतं. तशी आसामी जनता सहसा थोडक्यात समाधान मानणारी आणि अत्यंत निवांत स्वभावाची मानली जाते. जसं गोव्याचं ङ्कसुशेगादफ तसं आसाममधलं ङ्कलाहे लाहेफ जगणं आहे. पण त्यामुळे कुठलीही ऑर्डर - मग ते फर्निचर असो की पिझ्झा, यायला वेळ लागू शकतो हे अंगवळणी पडावं लागतं. ङ्कदादा, पिझ्झा कब आयेगा?फ विचारल्यावर समोरून अत्यंत मवाळ भाषेत ङ्कआने से आ जायेगा, मॅडम!फ हे ऐकण्याची तयारी ठेवावी लागते. तसंही आसाम म्हटलं की गेंडा(काझीरंगा), ब्रह्मपुत्रा, आणि चहा, अशा तीन गोष्टी आपल्याला आठवतात. एकशिंगी गेंडे बघायचे असतील तर संपूर्ण जगात आसाम हीच एकमेव जागा आहे. ८-१० किमी रुंद असणारं ब्रह्मपुत्रेचं पात्र हा बहुतेक मराठी लोकांसाठी विस्मयचकित करणारा अनुभव असतो. आसामात चहाला ङ्कसाफ म्हणतात. मुळात आसामी भाषेत ङ्कचफ चा उच्चार ङ्कसफ करतात. आणि ङ्कसफ चा ङ्कहफ आणि ङ्कहफ मात्र ङ्कहफ च राहतो. त्यामुळे ङ्कचाफ ङ्कसाफ बनतो. शिवाय इथे दुधाशिवायचा चहा असल्याने तो लालसर असतो. म्हणून तो ङ्कलाल साफ! कोकणात जशी ङ्कवाडीफ असते तशी आसाममध्ये ङ्कबारीफ असते. कारण ङ्कवफ चा ङ्कबफ होतो. शंकरदेवचा होंकरदेब होतो. मिरची मिर्सी तर चावल सावल होतात. अजून मज्जा म्हणजे आसामी मुलांची नावं - पौराणिक नावं इथं सर्रास ठेवली जातात - जसं की भृगु, वसिष्ठ किंवा हिरण्य. तसंच सुनंदा किंवा गौरी हे मुलाचं नाव असू शकतं, तर ङ्कविविधफ नावाची मुलगी असू शकते. खुद्द आसाम या शब्दाचा उदय अहोमपासून सुरू होऊन अखोम, असोम अशी वळणं घेतच झालाय. त्यामुळे इथे असमिया नाही तर अखमिया बोलली जाते. आसाममध्ये आल्यावर आवर्जून भेट द्यावा, इतका देखणा हिरवागार आमचा कॅम्पस आहे. जागोजागी तळी आणि त्याभोवतीचे वळणदार रस्ते यामुळे एका ठिकाणाहून दुसरीकडे जायला भले मोठे वळणदार रस्ते चालून जावं लागतं. ब्रह्मपुत्रेला पूर येतो तेव्हा ही तळीही काठोकाठ भरून जातात. संपूर्ण कँपस दिसू शकेल अशी मध्यवर्ती भागातली व्ह्यू-पॉइंट-हिल चढणं म्हणजे एक छोटासा ट्रेक करण्यासारखंच असतं. जमेल तितकं मूळचं जंगल टिकवून नवीन बांधकाम करायचा प्रशासनाचा प्रयत्न असतो. त्यामुळेच ओघाने येणारे इथले वन्यजीवन हा ही आमच्या रोजच्या जगण्यातलाच भाग आहेत. मग ते साप, उंदीर, मुंगूस यांसारखे छोटे प्राणी असो की माकडं, जॅकल्स, कधीमधी दर्शन देणारा बिबळ्या असो. विविध प्रजातींचे पक्षी आणि जलचरही सुखनैव राहतात. याशिवाय दर हिवाळ्यात येणारे स्थलांतरित पक्षी हे ही वेगळे आकर्षण आहे. बाकी, भटकी कुत्री, मांजरी, बदकं, कबुतरं नेहमीची जनता तर असतेच. पण मज्जा येते, जेव्हा हे जीव हक्काने आमच्या घरात येतात.. म्हणजे हिवाळ्यासाठी जपलेली पांघरुणं काढायला जावं तर त्या उबदार अंधाऱ्या जागी नागोबा पहुडलेला असू शकतो किंवा घरात डायनिंग टेबलवर ठेवलेली फळं किंवा केक खायला उघड्या बाल्कनीतून यायची एखाद्या माकडाची इच्छा होऊ शकते! बाकी रात्री अंधाऱ्या बेडरूममध्ये काजवे येणं किंवा मधमाश्यांनी कितीही हाकललं तरी घराच्या एखाद्या कोपऱ्यातच पोळं करणंही नेहमीचंच आहे. शेवटी माणसानेच त्यांच्या जागेवर अतिक्रमण केलेलं असल्याने ते ही इतर कुठे जाणार? कॅम्पसवरच्या रहिवाशांना या सगळ्या जीवजंतूंसकट राहणं अंगवळणी पडलेलं असतं, त्यामुळे फक्त नवीन येणाऱ्यांना या प्राणीजीवनाची सवय होईस्तोवर मदत करणं, इतकंच काय ते पाहायचं. महाराष्ट्रातल्या मंडळींना इकडे काय काय खायला मिळतं, याचं वेगळं अप्रूप असतं. आसाममधली एकंदर जमीन खूप पाणथळ आहे, त्यामुळे इथे बरेच तलाव असतात. ब्रह्मपुत्रेला पूर आला की सगळे तलावही भरून जातात. त्यामुळे साहजिकच मासे आणि भात इथलं प्रमुख अन्न आहे. टिपिकल आसामी थाळीमध्ये ताटाच्या मधोमध भाताची मोठी मूद, आणि आसपास डाळीचे १-२ प्रकार, विविध भाज्या (पालेभाज्या, फळभाज्या, ज्या काही लोकल वनस्पती मिळतील त्यांचे भाजीस्वरूप), दुधाचा एखादा पदार्थ (सहसा खीर असते), आणि माशांची किंवा मांसाची एखादी मोठी डिश असते. शाकाहारी माणसाने फक्त ही मांसाहारी साईड-डिश वगळली की झालं. आता मराठी जेवणाच्या हिशोबाने पाहिलं तर यात फक्त पोळीची भर पडते. आसाममध्ये आल्यानंतर आम्ही आता शाकाहारीचे मांसाहारी झालो. पण त्यामुळेच इथले गोड्या पाण्यातले मासे खायची सवय झाल्याने महाराष्ट्रातले खाऱ्या पाण्यातले मासे मुलांना आवडत नाहीत. भाकरीची पीठं वीर लागायच्या आधी संपवावी लागतात. आमच्या फोडण्यांमध्ये मोहरीच्या तेलाचा वापर वाढला आहे. आपल्या इतर लोणच्यांसोबतच स्टारफ्रूटसारख्या इथल्या लोकल फळभाज्यांची लोणची घालू लागलो आहोत. इतर पालेभाज्यांसोबतच अळू, राजगिरा, मोहरीच्या पानांच्या पालेभाज्या सवयीच्या झाल्या आहेत. अर्थात आजही ङ्कवरण-भातफ्व आमच्या मुलांचं कम्फर्ट फूड आहे. महाराष्ट्राबाहेर मुलांना इथे मोठं करताना आपलं ङ्कमराठीपणफ त्यांनी आत्मसात केलं पाहिजे, यासाठी सगळेच पालक सजग असतात. आमचंही तसंच झालं. त्यामुळे बाहेर इतर बंगाली-आसामी- हिंदी-इंग्रजी भाषांचा वापर असतानाही प्रत्येक घरात मराठीच बोलली जाते. मुलं लहान असताना मी त्यांना नाशिकच्या आनंद निकेतन या मराठी शाळेमध्ये एखाद-दोन महिन्यांपुरतं घालायचे म्हणजे त्यांची मराठीविषयीची आस्था टिकून राहील. गेल्या काही वर्षांत मराठी साहित्यातली सगळ्या प्रकारची पुस्तकं विकत घेऊन आमच्या घराचं मराठी ग्रंथालय व्हायची वेळ आली आहे. त्यामुळे आता ती पुस्तके दरवर्षी काही बॉक्सेस अशा वेगाने ठाण्यातल्या ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या एका संस्थेला पाठवणं आम्ही सुरू केलं आहे. आता आमची मुलं जेव्हा पुलंच्या-दमांच्या विनोदाला, संदिप खरेच्या गाण्यांना, अगदी भाडिपाच्या कोपरखळ्यांनाही उत्स्फूर्तपणे खळखळून हसतात, उत्तम लिखाणाला मनापासून दाद देतात, तेव्हा इतक्या वर्षांच्या आमच्या पाठपुराव्याचे सार्थक झालं, असं आम्ही मानतो. हे दोन्ही लेख माझ्यासारख्या आसाममध्ये असूनही कॅम्पसच्या आयआयटी कोषात राहणाऱ्या व्यक्तीने लिहिले असले तरी आसाममध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त येणारी माणसं भेटतच असतात. आमच्या आधी आलेल्यांनी अर्थात जास्त अवघड दिवस पाहिले आहेत. इथे दोन पिढ्या राहून आता इथलीच झालेली मराठी व्यापारी मंडळीही आहेत.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# फडणवीस-गडकरींच्या 'होमटाऊन'मध्ये चौथ्या विजयासाठी भाजप सज्ज; तर पुनरुज्जीवनाच्या आशेने काँग्रेस मैदानात

**नागपूर :** नगरपरिषद निवडणुकांचे निकाल जाहीर होताच उपराजधानीतील राजकीय हालचालींना वेग आला असून आता सर्वांचे लक्ष नागपूर महानगरपालिका निवडणुकीकडे लागले आहे. सलग तीन वेळा सत्तेवर असलेल्या भाजपसमोर चौथ्यांदा विजयाची संधी आहे.

नागपूर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे 'होमटाऊन' आहे. त्यामुळे भाजपसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे. नगरपरिषद निवडणुकांतील घवघवीत यशानंतर भाजपमध्ये आत्मविश्वास वाढला असून, त्याच पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह वरिष्ठ नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडली.





या बैठकीत मनपा निवडणुकीसाठीची रणनीती, प्रभागनिहाय तयारी आणि उमेदवार निवडीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.भाजपकडून या निवडणुकीकडे 'विकासाच्या अजेंड्यावर' लढत दिली जाणार आहे. मेट्रो प्रकल्प, उड्डाणपूल, रस्ते, स्मार्ट सिटी उपक्रम आणि पायाभूत सुविधांचा उल्लेख करत भाजप मतदारांसमोर गेल्याचे चित्र आहे. महानगर पालिकेच्या निवडणुकीत १५१ पैकी १२० जागा जिंकण्याचा दावा भाजप नेत्यांकडून केला जात आहे. मात्र, पक्षातील इच्छुकांची संख्या मोठी असल्याने उमेदवारी वाटप हे भाजपसमोरील मोठे आव्हान ठरणार आहे. वरिष्ठ नेत्यांनी अति आत्मविश्वास टाळण्याचा सल्ला देत तळागाळातील मतदारांपर्यंत पोहोचण्यावर भर दिला आहे. दुसरीकडे, काँग्रेससाठी ही निवडणूक पुनरुज्जीवनाची संधी मानली जात आहे. नागपूर काँग्रेस शहराध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांनी यंदा महापालिकेत 'करिश्मा' घडवण्याचा दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीत नितीन गडकरी यांना मिळालेल्या कडव्या लढतीनंतर काँग्रेसचे मनोबल वाढले आहे. बेरोजगारी, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापनातील त्रुटी, अंतर्गत रस्त्यांची दयनीय अवस्था आणि तुंबणाऱ्या गटारांचे प्रश्न काँग्रेसकडून आक्रमकपणे मांडले जाण्याची शक्यता आहे.नागपूरमध्ये महायुतीत राष्ट्रवादी आणि शिवसेना पेक्षा भाजपची टाकत मोठी आहे. त्यामुळे भाजप स्वबळावर लढण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येत आहे. तर महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसमध्येही इच्छुकांची संख्या मोठी आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आणि शिवसेनेची ताकद विभागली गेल्याने त्यांचा प्रभाव कमी आहे. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत भाजपने १०८ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले होते, तर काँग्रेस २९ जागांवर समाधान मानावे लागले होते. आता मात्र दीर्घकाळ सत्तेत असलेल्या भाजपसमोर जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आव्हान आहे, तर विरोधकांसमोर सत्ताधाऱ्यांविरोधातील असंतोषाचे मतांमध्ये रूपांतर करण्याची संधी आहे.

## पुण्यातील भाजपचा पहिला नगरसेवक दादांच्या गळाला

**पिंपरी :** महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजताच सुमारे २५ माजी नगरसेवक व नेत्यांचा समावेश करून राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) धक्का अजित पवार यांनी आता पलटवार देणाऱ्या भाजपवर उपमुख्यमंत्री केला आहे. नाराज असलेले माजी नगरसेवक आपल्या कट्टर विरोधकांना पक्षात प्रवेश दिल्याने संदीप वाघेरे यांनी भाजपला 'जय श्रीराम' केला आहे. सोमवारी पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांनी 'राष्ट्रवादी काँग्रेस' मध्ये प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे पिंपरी गाव, पिंपरी आणि परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसची स्थिती अधिक भक्कम झाली आहे.

कट्टर हिंदुत्ववादी नेता म्हणून ओळख असलेले संदीप वाघेरे २०१७च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपकडून नगरसेवक म्हणून निवडून आले होते. पिंपरी परिसरातील भाजपचे ते पहिले नगरसेवक ठरले होते. कार्यकाळात त्यांनी मिलिटरी डेअरी फार्म पुलासह पिंपरी परिसरातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले. भ्रष्ट आणि मनमानी कारभाराविरोधात त्यांनी सातत्याने आवाज



उठवला. यासाठी त्यांनी सत्ताधारी पक्षात असतानाही तडजोड केली नाही. ज्या ठिकाणी त्यांच्या प्रभागातील विकासकामांना अडथळे आणले गेले, तेथे त्यांनी स्वतःच्या चनिही कामे पूर्ण केली; त्यांची प्रतिमा लोकाभिमुख नेत्याची झाली.मागील निवडणुकीत वाघेरे यांनी 'राष्ट्रवादी'चे माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे यांचा पराभव केला. दोन दिवसांपूर्वीच्या 'मेगा भरती'त भाजपने त्यांचे कट्टर विरोधक संजोग आणि त्यांची पत्नी उषा वाघेरे यांना पक्षात प्रवेश दिला. याला संदीप यांनी तीव्र विरोध केला. विकासकामांच्या जोरावर भाजपचा चार सदस्यीय संपूर्ण पॅनेल निवडून आणण्याचे आश्वासन त्यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना दिले होते; तरीही भाजपने तिन्ही नेत्यांना पक्षात प्रवेश दिला.

## रावसाहेब दानवेंना सत्तारांचा मोठा झटका

**सिल्लोड :** नगरपरिषदेत अब्दुल सत्तारांचे पुत्र अब्दुल समीर यांनी ३,५०० पेक्षा जास्त मतांच्या फरकाने नगराध्यक्षपदावर कब्जा मिळवला आहे. सत्तारांच्या पॅनेलने नगरसेवक पदाच्या जागांवरही वर्चस्व गाजवत सिल्लोड हा आपलाच बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले.विजयानंतर पत्रकारांशी बोलताना अब्दुल सत्तार यांनी रावसाहेब दानवे यांच्यावर टीकेची तोफ डागली. सत्तार म्हणाले, 'सिल्लोडमध्ये येऊन आमचं काहीही बिघडवू शकत नाही, हे त्यांना आता समजलं असेल. आम्ही तर त्यांच्या भोकरदन आणि फुलंब्रीमध्ये घुसून त्यांचं गणित बिघडवून दाखवलंय. ज्यांना स्वतःच्या गावाची खुर्ची वाचवता आली नाही, ते सिल्लोडचा विचार करत होते.' भोकरदन हा रावसाहेब दानवे यांचा बालेकिल्ला असून कन्नडमध्ये त्यांची कन्या संजना जाधव या आमदार असूनही या ठिकाणीही पराभवाचा सामना करावा लागल्याने सत्तारांनी हा खोचक टोला लगावला आहे.सत्तार आणि दानवे यांच्यातील राजकीय वैर जुनेच आहे.

## प्रभागात केवळ २५६ मतदार, १७८ जणांनी बटन दाबलं 'ट्विस्ट'च 'ट्विस्ट'!

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील कांद्री-कन्हान नगरपंचायतीच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून शिवसेनेच्या शिंदे गट उमेदवार मीनाक्षी विशाल भुते यांनी नगरसेविका म्हणून विजय मिळवला आहे. विशेष म्हणजे हा प्रभाग नगरपंचायतीतील सर्वात लहान प्रभाग असून, कमी मतदारसंख्या आणि त्रिकोणी लढत असूनही मीनाक्षी भुते यांनी ठामपणे विजय खेचून आणला आहे. मिळालेल्या ८९ मतांच्या जोरावर त्यांनी प्रतिस्पर्ध्यांवर ३४ मतांची निर्णायक आघाडी घेतली.प्रभाग क्रमांक १ मध्ये एकूण २५६ मतदार नोंदणीकृत होते. यापैकी १७८ मतदारांनी प्रत्यक्ष मतदान केले. मतदानाच्या आकडेवारीनुसार काँग्रेस उमेदवाराला ३४ मते मिळाली, अपक्ष उमेदवाराला ५५ मते मिळाली, तर नोटाला १ मत पडले. अशा परिस्थितीत मतांचे स्पष्ट विभाजन झाले होते. या विभाजनाचा फायदा मीनाक्षी भुते यांना झाला आणि त्यांनी सर्वाधिक ८९ मते मिळवत विजय संपादन केला.

या प्रभागात एकूण तीन उमेदवार रिंगणात होते. शिवसेनेकडून मीनाक्षी भुते, काँग्रेसकडून एक उमेदवार आणि एक अपक्ष उमेदवार अशी थेट लढत होती. कमी मतदारसंख्या असल्यामुळे प्रत्येक मत महत्त्वाचे ठरत होते. स्थानिक पातळीवरील संपर्क, घराघरात पोहोचलेला प्रचार आणि नागरिकांच्या प्रश्नांवर केंद्रित भूमिका यामुळे मीनाक्षी भुते यांना मतदारांचा विश्वास मिळवले.विजयानंतर प्रतिक्रिया देताना मीनाक्षी भुते म्हणाल्या, प्रभाग क्रमांक १ हा सर्वात लहान प्रभाग असला तरी येथील नागरिकांचा विश्वास माझ्यासाठी खूप मोठा आहे. एकूण २५६ मतदारांपैकी मला ८९ मते मिळाली आणि ३४ मतांची आघाडी घेत मी विजयी झाले. या विजयामागे शिवसेनेचे संघटन, कार्यकर्त्यांची मेहनत आणि नागरिकांचा पाठिंबा आहे. कांद्री नगरपंचायतीतील हा निकाल दाखवतो की, केवळ मोठी मतसंख्या किंवा मोठा प्रभाग असणेच विजयाचे मोजमाप नसते, तर स्थानिक प्रश्नांची जाण, विश्वासार्ह नेतृत्व आणि थेट संवाद यामुळेही निवडणूक जिंकता येते. मीनाक्षी भुते यांचा हा विजय 'लहान प्रभागातून मोठा संदेश' देणारा ठरला आहे.

## ३० वर्षांच्या कष्टांचं राजकारण पैशांवर भारी'; निकालावर थोरातांची प्रतिक्रिया

**अहिल्यानगर :** महाविकास आघाडी म्हणूनच अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक लढवणार, अशी ठाम भूमिका माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केली. जागावाटप करताना ज्याची निवडून येण्याची पात्रता आहे, त्यालाच सोबत घेतले जाईल. मित्र पक्षांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय होईल. वंचित बहुजन आघाडीबाबत अद्याप शहर पातळीवर चर्चा झालेली नाही. योग्य वेळी चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल,ब्ब असे त्यांनी सांगितले. जामखेड नगरपरिषद निकालानंतर काँग्रेसला 'बी टीम' म्हणणाऱ्या रोहित पवार यांच्यावर थोरातांनी अप्रत्यक्ष पण तीव्र टीका केली. आम्ही आधीच सांगितले होते की जामखेडमधील काँग्रेस कार्यकर्त्यांना सोबत घ्या. तिथे नेतृत्वाविरोधात तीव्र नाराजी होती. विधानसभा निवडणुकीतील नाराजीही होती. निवडणूक लढताना तडजोड करावी लागते, सर्वांना सोबत घ्यावे लागते. हा आग्रह मी केला होता, पण तो मान्य झाला नाही. त्यामुळे काँग्रेसने आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न केला,ब्ब असे थोरात म्हणाले.श्रीरामपूर व संगमनेरमध्ये मिळालेले यश हे सध्याच्या प्रचाराचे नाही, तर ३० वर्षांच्या प्रामाणिक कामाचे आहे, असे ठामपणे सांगत थोरातांनी कार्यकर्ते व नागरिकांचे अभिनंदन केले. शहर सुंदर व शांत ठेवण्यासाठी केलेले दीर्घकालीन कामच या विजयामागे आहे. संगमनेरमध्ये काँग्रेसचे चिन्ह वापरले नाही, कारण समविचारी नागरिकांना एकत्र आणायचे होते. विधानसभा निवडणुकीप्रमाणेच सर्वांना सोबत घेऊन ही निवडणूक जिंकली, असे त्यांनी नमूद केले. पैशाच्या राजकारणावर टीका करताना ते म्हणाले,



प्रामाणिक कष्ट करणाऱ्याला जनता उचलतेच, पण पैसे घेऊनही काही जण मतं खेचून नेतात, तेव्हा खूप दुःख होतं.मुंबईसाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येऊन लढत आहेत. आम्ही त्यांच्या सोबत आहोत. मात्र काही निर्णय अखिल भारतीय काँग्रेस कमिटीशी चर्चा करूनच घेतले जातील, असे थोरात म्हणाले.निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत थोरातांनी निवडणूक आयोगावर जोरदार ताशेरे ओढले. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांचेच ऐकतो, अशी भावना वाढतेय. ऐनवेळी १५ दिवसांनी निवडणूक पुढे ढकलणे, अर्जानंतर अवघ्या चार दिवसांत चिन्ह वाटप, हे चुकीचे निर्णय आहेत. उमेदवार, कार्यकर्ते, नागरिक सगळ्यांना त्रास होतो. निर्णयाविरुद्ध अपीलचीही जागा ठेवली जात नाही. प्रशासनावर नागरिकांचा विश्वास उरलेला नाही,ब्ब अशी खंत थोरातांनी यावेळी व्यक्त केली.महायुतीकडून प्रचंड प्रचार झाला. हेलिकॉप्टर, ये-जा, बॅगा उतरतानाही दिसल्या. आमच्याकडे ना हेलिकॉप्टर ना विमान. तरीही नागरिकांनी आमच्या कामावर आणि विश्वासावर मतदान केलं,असे थोरात म्हणाले.पुणे-नाशिक रेल्वे सरळ जोडायला हवी. मध्ये दुसरीकडे वळवण्याचं कारण कळत नाही. अकोल्याला रेल्वे गेली तर पर्यटन वाढेल, त्याला चालना मिळेल. अकोलेबाबत आमची कोणतीही अडचण नाही, असे थोरातांनी स्पष्ट केले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दारु पिऊन पत्नीला सतत त्रास द्यायचा, बीडमध्ये पतीने नातेवाईकाला संपवलं; मग शेतात बॉडी

**बीड :** बीडच्या अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव शिवारात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली होती. बीड स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे अवघ्या दोन दिवसांत या खुनाचा छडा लावून मुख्य आरोपीसह चार जणांना अटक केली आहे.

१८ डिसेंबर २०२५ रोजी जवळगाव येथील गायरान शेतात स्वप्निल ऊर्फ चिंगू अशोक ओव्हाळ (३०, रा. चक्रे गल्ली, रेणापूर) याचा मृतदेह पालथ्या स्थितीत आढळून आला होता. शवविच्छेदन अहवालात स्वप्निलचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर बर्दापूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी मुख्य आरोपी गोरोबा




मधूकर डावरे (४५, रा. जवळगाव, ता. अंबाजोगाई) याच्यासह त्याचे साथीदार संतोष लिंबाजी मांदळे (३४, रा. इंडियानगर, लातूर), किशोर गोरोबा सोनवणे (२९, रा. बसवेश्वर चौक, लातूर) आणि अमोल विनायक चव्हाण (२६, रा. एस. टी. क्वार्टर, लातूर) यांना २० डिसेंबर रोजी ताब्यात घेतले. मृत स्वप्निल हा मुख्य आरोपी गोरोबा याचा नातेवाईक होता. स्वप्निल हा सतत दारू पिऊन पत्नीला आणि गोरोबा यांना त्रास देत असे, तसेच त्याने वादात गोरोबाच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला होता. याच रागातून गोरोबाने त्याला रेणापूर येथून जवळगावला आणले आणि गळा आवळून त्याची हत्या केली.सदर प्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २९९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वर कांबळे, सुशांत सुतळे, मारुती कांबळे, रामचंद्र केकान, विष्णू सानप, गोविंद भताने, सचिन आंढळे, विकी सुरवसे, अतुल हराळे, शरद कदम आणि कडुबा म्हेत्रे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पूर्ण केली.

## अरे संदेश, हे कसं जमेल मला ? विवाहित प्रेयसीकडे प्रियकराची भलतीच मागणी



**पुणे :** घर सोडून आलेल्या विवाहित प्रेयसीला तिच्या अविवाहित प्रियकराने पट्टा व लोखंडी कुलूपाने बेदम मारहाण केली. ही घटना गुरुवारी (१८ डिसेंबर) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास पुण्यातील अमरदीप कॉलनी, ज्योतिबानगर, काळेवाडी येथे घडली. 'सासूचे घर विकून पैसे आणून दे,' अशी भलतीच मागणी प्रियकर करत असल्याने विवाहिता नकार देत होती. त्यामुळे चिडून तरुणाने तिला बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे.या प्रकरणी जखमी महिलेने काळेवाडी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार संदेश चोपडे (अमरदीप कॉलनी, ज्योतिबानगर, काळेवाडी) याला अटक केली आहे.आरोपी अविवाहित असून, त्याचे विवाहित फिर्यादी महिलेसोबत प्रेम संबंध होते. महिला चार दिवसांपूर्वी घर सोडून चोपडे याच्याकडे राहण्यास आली. दरम्यान चोपडे याने महिलेला तिच्या सासूचे घर विकावे आणि पैसे आणून द्यावे, अशी मागणी केलीया कारणावरून वाद घालून लाथाबुक्क्यांनी आणि कमरेच्या पट्ट्याने बेदम मारहाण केली. त्यानंतर जीवे मारण्याच्या उद्देशाने घरातील मोठ्या कुलूपाने डोक्यात ठिकठिकाणी वार करून तिला गंभीर जखमी केले. या प्रकरणी पोलिसांनी संदेश याला अटक केली आहे.

## रोज रात्री खोलीत डांबलं अनब मारहाण केली ; १० मजुरांसोबत अमानुष घडलं


**ठाणे :** आपण २१ व्या शतकात वावरत असलो तरी आजही वेठबिगार किंवा बंधबिगार मजुरीसारखी अमानुष प्रथा सुरू असल्याचे एक धक्कादायक वास्तव समोर आले आहे. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ पश्चिम येथील 'मे. शक्ती फूड इंडस्ट्रीज' या कंपनीत ही संतापजनक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, सध्या संपूर्ण प्रशासन विधानसभा निवडणुकीच्या कामात व्यस्त असतानाही, जिल्हा प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेमुळे या शोषणाच्या विळख्यातून १० परप्रांतीय कामगारांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे.उत्तर प्रदेशातील भदोही आणि जौनपूर जिल्ह्यातील १० कामगारांना निक्की उर्फ कृष्णा कुमार अग्रहारी आणि नितीन तिवारी या दोन ठेकेदारांनी अंबरनाथमध्ये कामासाठी आणले होते. त्यांना महिन्याला १८ ते २० हजार रुपये पगार, राहण्याची आणि जेवणाची उत्तम सोय देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात परिस्थिती अत्यंत भयानक होती.या कामगारांना एका लहान खोलीत कोंबून ठेवले जात असे. दिवसभर



अतिशय कष्टाचे काम करवून घेऊनही त्यांना पुरेसे जेवण दिले जात नव्हते. पगार देणे तर दूरच, उलट त्यांना मारहाण केली जात होती. बाहेर कोणाशी संपर्क साधू नये म्हणून त्यांचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले होते आणि रात्री त्यांना ज्या खोलीत ठेवले जायचे, त्या खोलीला बाहेरून कुलूप लावले जात असे.या नरकयातनेतून १७ डिसेंबर रोजी कमलेश फुन्नन बनवासी या कामगाराने कशीबशी स्वतःची सुटका करून घेतली. त्याने थेट ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गाठले आणि आपल्यावर व इतर सहकाऱ्यांवर होत असलेल्या अत्याचाराची माहिती दिली. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायमूर्ती रवींद्र पाजणकर यांनी तातडीने जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना याची कल्पना दिली. जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनीही निवडणुकीच्या कामाचा ताण बाजूला सारत तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

# बाथरुममध्ये संबंध अनब ती बेशुद्ध पडली, अतिरक्तस्त्राव झाल्याने गर्लफ्रेंडचा मृत्यू, २० वर्षांच्या बॉयफ्रेंडला अटक

**हैदराबाद :** एका २२ वर्षीय महिलेचा शारीरिक संबंधांनंतर मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. तेलंगणाच्या महबूबनगर जिल्ह्यातील मुसेपेट मंडलात ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिलेचा लैंगिक अत्याचारानंतर मृत्यू झाला. या प्रकरणात पोलिसांनी मृत तरुणीचा २० वर्षांचा प्रियकर विवेकला अटक केली आहे. याप्रकरणी तरुणीच्या वडिलांनी प्रियकरावर लैंगिक अत्याचाराचा आरोप केला आहे.ही घटना १७ डिसेंबरच्या रात्री घडल्याची माहिती आहे. आरोपीने तरुणीला भेटण्यासाठी बोलावले. तेलंगणा पोलिसांनी सांगितले की दोघे एकमेकांना ओळखत होते. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, तात्काळ तपास सुरू करण्यात आला आहे. पोलिस तपासात असे दिसून आले की लैंगिक अत्याचार हा बाथरुममध्ये झाला आहे. घटनेदरम्यान, तरुणी अचानक बेशुद्ध पडली आणि तिला खूप रक्तस्त्राव होऊ लागला. तिची प्रकृती बिघडल्याने आरोपी आणि इतरांनी तिला रुग्णालयात नेले.



मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात तणाव आणि संताप निर्माण झाला.मृत तरुणीच्या वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपी विवेकवर भारतीय कायद्याच्या संबंधित कलमांखाली आरोप लावण्यात आले आहेत. याशिवाय, या प्रकरणात एससी/एसटी (अत्याचार प्रतिबंधक) कायद्याचे कलम लागू करण्यात आले आहेत. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे आणि त्याची चौकशी सुरू केली आहे.पोलिसांनी सांगितले की, महिलेच्या मृतदेहाची पोस्टमॉर्टम करण्यात आली आहे. फॉरेन्सिक नमुने देखील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. पोस्टमॉर्टम आणि फॉरेन्सिक अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या अहवालांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. पोलिस सर्व बाजूंनी प्रकरणाचा तपास करत आहेत. आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे आणि तपास सुरू आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# इशान किशनला आधी वर्ल्ड कपसाठी भारतीय संघात स्थान अन आता कर्णधारपद



**मुंबई :** नुकतीच सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी पार पडली. या स्पर्धेचा विनर झारखंडचा संघ झाला. झारखंडला प्रथमच सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी जिंकवणारा इशान किशन हा पहिला कर्णधार बनला. Ishan Kishan या विजेत्या संघाचा कर्णधार होता. Syed Mushtaq Ali Trohy मध्ये इशानने दमदार कामगिरी केली ज्याचे फळ त्याला लगेचच मिळाले. इशानला भारतीय संघात तर जागा मिळालीच पण आता पुन्हा एकदा कर्णधारपदाची जबाबदारीही मिळाली आहे.

मागील काही वर्षापासून इशान टीम इंडियातून बाहेर होता. आता त्या टीम इंडियाचा स्टार विकेटकीपर-फलंदाज इशान किशनने अलिकडेच झारखंडला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये विजय मि ळवून दिला. परिणामी, इशानला आणखी एक बक्षीस मिळाले आहे, तळक्षरू करूरीश ढीहू झारखंडचा कर्णधार बनणे. विजय हजारे ट्रॉफी २४ डिसेंबरपासून सुरू होत आहे. संघ अहमदाबादमध्ये कर्नाटकविरुद्ध पहिला सामना खेळेल. झारखंडच्या संघात कुमार कुशाग्र, अनुकुल रॉय, रॉबिन मिंझ, अभिनव शरण आणि विराट सिंग सारखे खेळाडू आहेत.इशान किशन (विकेटकीपर आणि कर्णधार), विराट सिंग, उत्कर्ष सिंग, कुमार कुशाग्र (विकेटकीपर आणि उपकर्णधार), रॉबिन मिंझ, अनुकुल रॉय, शरणदीप सिंग, शिखर मोहन, पंकज कुमार (विकेटकीपर), बाला कृष्णा, एमडी कौनैन कुरेशी, शुभ शर्मा, अमित कुमार, मनीषी, अभिनव शरण, सुशांत मिश्रा, विकास सिंग, सौरभ शेखर, राजनदीप सिंग आणि शुभम सिंग.

इशान किशनने झारखंडला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये पहिल्यांदाच जेतेपद मिळवून दिले. त्याने १० डावात ५७.४४ च्या सरासरीने एकूण ५१७ धावा केल्या, ज्यात दोन शतके आणि दोन अर्धशतके होती. हरियाणाविरुद्धच्या अंतिम सामन्यात इशानच्या १०१ धावांच्या खेळीने संघाला ट्रॉफी मिळवून दिली. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये त्याच्या प्रभावी कामगिरीम ुळे, इशान किशनचा २०२६ च्या टी-२० विश्वचषक संघात समावेश करण्यात आला आहे. तो संजू सॅमसननंतर संघातील दुसरा यष्टीरक्षक-फलंदाज असेल. विश्वचषक संघात ईशान किशनच्या निवडीबद्दल मुख्य निवडकर्ता अजित आगरकर म्हणाले, 'तो व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आहे. तो चांगल्या फॉर्ममध्ये आहे.

तो यापूर्वी भारताकडून खेळला आहे. एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याचे द्विशतक आहे.' तो आधी टीम इंडियाचा भाग नव्हता कारण त्यावेळी पंत आणि जुरेल तिथे होते.'

# स्मृती मानधनाने महा रेकॉर्डसह रचला इतिहास, कोणालाच गोष्ट जमली नाही..

**विशाखापट्टणम :** स्मृती मानधनाने मैदानात पाऊल ठेवताच महा रेकॉर्डसह इतिहास रचला आहे. स्मृतीसारखी कामगिरी आतापर्यंत कोणत्याच खेळाडूला करता आलेली नाही.काही दिवसांपूर्वी स्मृतीच्या आयुष्यात वाईट गोष्ट घडली होती. लग्न काही तासांवर येऊन ठेपलं होतं आणि तिच्या वडिलांना हार्ट अटॅक आला होता. तेव्हा स्मृतीने पलाश मुच्छलबोरबरचं लग्न पुढे ढकललं होतं. पण त्यानंतर काही दिवसांनी स्मृतीने आपण पलाशबरोबर लग्न करणार नसल्याचं अखेर स्पष्ट केलं. स्मृतीसाठी हा सर्वात वाईट काळ होता. पण स्मृती या परिस्थितीबरोबर झुंजली आणि ही रणरागिरी आता मैदानातही उतरली. मैदानात उतरताच स्मृती मानधनाने इतिहास रचला स्मृती वर्ल्ड कपनंतर मैदानात पुनरागमन करत होती. त्यामुळे तिच्याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. पण स्मृतीच्या फलंदाजीत कोणतीही कमतरता यावेळी दिसली नाही. श्रीलंकेच्या संघाला १२१ धावा करता आल्या होत्या. भारतीय संघापुढे विजयासाठी १२२ धावांचे आव्हान होते, हे आव्हान पार करण्यासाठी स्मृती मैदानात उतरली होती. सर्वांच्या नजरा स्मृतीच्या प्रत्येक हालचालींवर होतं. स्मृतीने यावेळी भारताला झोकात सुरुवात करून दिली. स्मृतीने चार चौकारांसह भारताला धडाकेबाज सुरुवात करून दिली. स्मृतीला यावेळी २५ धावा करता आल्या असल्या तरी तिने संघाला जी सुरुवात करून दिली ती महत्वाची ठरली. स्मृतीने य साम न्यात २४ धावा पूर्ण केल्या आणि तिने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. कारण स्मृतीने आता टी २० क्रिकेटमध्ये चार हजार धावांचा पल्ला गाठला आहे. भारताकडून कोणत्याही खेळाडूला अशी कामगिरी आतापर्यंत करता आलेली नाही. त्यामुळे भारताकडून महिला टी २० क्रिकेटमध्ये चार हजार धावांचा पल्ला गाठणारी ती पहिलीच खेळाडू ठरली आहे. त्यामुळे स्मृतीने मैदानात उतरताना पहिल्या सामन्यातच हा मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. त्यामुळे भारताच्या या पहिल्या टी २० सामन्यात तिच्याच नावची जोरदार चर्च असल्याचे पाहायला मिळाले.स्मृतीने पहिल्याच टी २० सामन्यात आपल्या नावावर एक मोठा रेकॉर्ड केला आहे. त्यामुळे आता दुसऱ्या टी २० सामन्यात स्मृती कशी कामगिरी करते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.



# युझी चहलने दिली गुड न्यूज

**मुंबई :** भारतीय क्रिकेटपटू युजवेंद्र चहल डेंग्यू आणि चिकनगुनियाने ग्रस्त आहे. त्याने नुकतीच सोशल मीडियावर ही माहिति शेअर केली. आजारामुळे तो सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या अंतिम फ रीत खेळू शकला नाही. त्याने म्हटले की या दोन्ही आजारांचा त्याच्या आरोग्यावर खूप वाईट परिणाम झाला आहे. आता या सगळ्या दरम्यान चहलने एक गुड न्यूज दिली आहे.भारतीय क्रिकेटपटू र्धीशिपवीर उहरहरश्र बीएमडब्ल्यू झेड४ खरेदी केली आहे, ही खरेदी त्याने स्वतः जाहीर केली आहे. यामुळे त्याच्या कार कलेक्शनमध्ये आणखी एक आलिशान कारची भर पडली आहे, परंतु चहल म्हणाला की, 'माझ्यासाठी खरी लक्झरी म्हणजे माझ्या पालकांच्या चेहऱ्यावर आनंद पाहणे'. काही दिवसांपूर्वीच बातमी आली होती की चहलला डेंग्यू आणि चिकनगुनिया एकाच वेळी झाला आहे. म्हणूनच तो सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी फायनलमध्ये खेळू शकला नाही.क्रिकेटपटू चहलने त्याच्या पालकांसह त्याच्या नवीन कारचे कव्हर काढतानाचा एक व्हिडिओ इंस्टाग्रामवर शेअर केला. त्याने पोस्टला कॅप्शन दिले, 'माझे प्रत्येक स्वप्न सत्यात उतरवणाऱ्या दोन लोकांसह मी माझी नवीन कार घरी आणली. माझ्या पालकांना या क्षणाचा साक्षीदार आणि आनंद घेताना पाहणे हीच



खरी लक्झरी आहे.'युझवेंद्र चहलने बीएमडब्ल्यू झेड४ खरेदी केली आहे, ही एक प्रीमियम स्पोर्ट्स कार आहे. ही लक्झरी कार तिच्या आकर्षक डिझाइन आणि पावरफुल परफॉर्मेंस ओळखली जाते. भारतात किंमती सुमारे ८८ लाखांपासून सुरू होतात. बीएमडब्ल्यू झेड४ मध्ये २९९८ सीसी इंजिन आहे, जे ३३५ बीएचपी आणि ५०० एनएम टॉर्क निर्माण करते आणि तिचा टॉप स्पीड ताशी २५० किमी आहे.

अनुभवी फिरकी गोलंदाज युझवेंद्र चहल चिकनगुनिया आणि डेंग्यूमुळे सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी फायनलमध्ये खेळू शकला नाही. त्याचा संघ, हरियाणा, पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचला. झारखंडने अंतिम फेरीत हरियाणाला हरवून पहिले विजेतेपद जिंकले, ज्यामध्ये इशान किशनने ऐतिहासिक शतक झळकावले.

# गिलला अजून एक मोठा धक्का, टी२० संघातून काढलं आता

**अहमदाबाद :** ...

२२-११

नवी दिल्ली : शुभमन गिलला एक मोठा धक्का काही तासांपूर्वीच बसला आहे, पण त्याला आता अजून एक मोठा धक्का बसणार असल्याचे आता समोर येत आहे.शुभमन गिल यशाच्या शिड्या फार लवकर चढत गेल्याचे पाहायला मिळाले. पण तसंच त्या शिड्या त्याला तेवढ्याच लवकर उतराव्या लागतील, असे दिसत आहे. इंग्लंडच्या दौऱ्यापूर्वी रोहित शर्माकडून कसोटी संघाचे कर्णधारपद काढून घेतले होते. रोहित शर्माच्या या जागी शुभमन गिलला संघाचे नेतृत्व देण्यात आले. रोहित शम नि आपल्या नेतृत्वाखाली देशाला चॅम्पियन्स ट्रॉफ जिंकवून दिली होती. पण तरीही काही कारण न देता रोहित शर्माकडून वनडे संघाचेही कर्णधारपद काढून घेतले. पुन्हा एकदा शभमन गिलला बढती देण्यात आली आणि त्याला भारताच्या वनडे संघाचे कर्णधारपद दिले. शुभमन गिल भारताच्या टी २० संघात नव्हता, पण तरीही त्याला टी २० संघात स्थान दिलेच, पण थेट उप कर्णधारही केले. फार कमी वेळात शुभमन गिलला हे यश मिळत गेले. पण आता शुभमनला गिलला एकामागून एक धक्के बसायला सुरुवात झाली आहे, याची सुरुवात भारताच्या टी २० वर्ल्ड कपच्या संघापासून झाली. उप कर्णधार असूनही शुभमन गिलला संघाबाहेर काढण्यात आले. पण त्यानंतर शुभमन गिलला आता अजून एक मोठा धक्का बसणार असल्याचे समोर आले आहे.शुभमन गिल आता भारताच्या टी २० संघात दिसणार नाही. पण श्रेयस अय्यरच्या रुपात आला शुभमन गिलला मोठा धक्का बसू शकतो, असे पाहायला मिळत आहे. बीसीसीआयमधील सूत्रांनी सांगितले की, शुभमन गिलकडे कसोटी आणि वनडे संघाचे कर्णधारपद आहे. शुभमन गिलने कसोटी संघाचे कर्णधारपद चांगले भूषवले आहे. पण शुभमन गिलला वनडे संघाच्या कर्णधारपदाला न्याय देता येत नसल्याचे दिसत आहे. शुभमन गिलपेक्षा चांगला अनुभव आहे श्रेयस अय्यरकडे आहे, आयपीएलमध्येही त्याने चांगले नेतृत्व केले होते. त्यामुळे आता शुभमन गिलकडून वनडे संघाचे कर्णधारपद जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.शुभमन गिलचे अच्छे दिन आता संपत असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे आता शुभमन गिलबाबत काय होतं, याची उत्सुकता सर्वांना असणार आहे.



# शिल्पा-राजच्या परदेश वारीला बंदी कायम



**मुंबई :** बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. ६० कोटी रुपयांच्या (अंदाजे १.६ अब्ज डॉलर्स) फसवणुकीच्या प्रकरणात या कपलविरुद्ध लूक आउट सर्क्युलर (ङजउ) जारी करण्यासाठी न्यायालयाने कडक अटी लादल्या आहेत. न्यायालयाने राष्ट्रीयकृत बँकेकडून ६० कोटी रुपयांची रोख रक्कम किंवा त्याच रकमेची बँक हमी देणे अनिवार्य केले आहे. राज कुंद्राच्या आजारी वडिलांच्या आजाराचे कारण देत लंडनला प्रवास करण्याची परवानगी मागणाऱ्या याचिकेबाबत न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की या अटीशिवाय परदेश प्रवास करणे अशक्य आहे.

कपलचे प्रतिनिधित्व करणारे वरिष्ठ वकील आबाद पोंडा यांनी ६० कोटी रुपयांच्या संपूर्ण ठेवीला विरोध केला आणि जामीन किंवा इतर वाजवी पर्यायाची विनंती केली. त्यांनी आग्रह धरला की ही यात्रा केवळ वैद्यकीय कारणांसाठी आवश्यक आहे. पण, न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ही विनंती फेटाळून लावली आणि स्पष्टपणे सांगितले की ङजउ रद्द करण्यासाठी संपूर्ण रक्कम किंवा बँक हमी देणे अनिवार्य आहे. याचिकेत म्हटले आहे की राज कुंद्राचे वडील बऱ्याच काळापासून दुर्मिळ लोहाच्या कमतरतेमुळे (निदान न झालेले लोह-अमोनियाची कमतरता) ग्रस्त आहेत. त्यामुळे अंतर्गत रक्तस्त्राव आणि श्वास घेण्यास गंभीर त्रास होत आहे. डॉक्टरांनी रिपीट कॅप्सूल एंडोस्कोपी किंवा डबल-बलून एन्टरस्कोपी करण्याची शिफारस केली आहे. वैद्यकीय हवाला देत आणि त्यांच्या वडिलांची प्रकृती झपाट्याने खालावत असल्याचे सांगून या कपलने २० जानेवारी २०२६ पूर्वी परदेशात प्रवास करण्याची परवानगी मागितली.

गेल्या महिन्यात, कपलने ६० कोटी रुपयांच्या फसवणुकीचा आरोप करणारा एफआयआर रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली आणि अंतिम सुनावणीपर्यंत पोलिसांना आरोपपत्र दाखल करण्यापासून किंवा कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यापासून रोखण्याची विनंती न्यायालयाला केली. तक्रारदार दीपक कोठारी यांनी आरोप केला आहे की २०१५ ते २०२३ दरम्यान शिल्पा-राज यांनी त्यांना त्यांच्या कंपनी 'बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड' मध्ये ६० कोटी रुपये गुंतवण्याचे आमिष दाखवले होते. परंतु त्यांनी या पैशाचा वापर वैयक्तिक फायद्यासाठी आणि लक्झरी खर्चासाठी केला.

# अभिनेत्री माधुरी दिक्षीत होती पैशांच्या व्यवहारात कमकुवत !




**मुंबई :** बॉलिवूडवर ९० च्या दशकात अधिराज्य गाजवणारी सुपरस्टार माधुरी दीक्षित ही अभिनय, नृत्य आणि सौंदर्याचा उत्तम संगम मानली जाते. माधुरीची लोकप्रियता इतकी प्रचंड होती की अनेकदा तिच्या आणि सहकलाकारांच्या नावांवरून अफवा उठत असत. मात्र, करियरच्या भरात असतानाच परदेशस्थ हृदयविकारतज्ज्ञ डॉ. श्रीराम नेने यांच्याशी लग्न करत तिने बॉलिवूडला दिलेला अचानक रामराम सर्वांना थक्क करून गेला. लग्नानंतर माधुरीचं आयुष्य पूर्णपणे बदललं आणि त्या बदलांपैकी सर्वाधिक महत्वाचा होता आर्थिक स्वावलंबनाचा प्रवास!

माधुरीने नुकत्याच दिलेल्या एका खास मुलाखतीत स्वीकारलं की तिने खूप लहान वयातूनकेवळ १७व्या वर्षीकमाई सुरू केली होती. ९० च्या दशकात ती बॉलिवूडमधील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक होती. एका चित्रपटासाठी तब्बल १ कोटी रु. फी घेत असल्याच्या चर्चाही जोरात होत्या. तरीही, एवढी प्रचंड कमाई असूनदेखील ती स्वतः आर्थिक व्यवहार हाताळत नस. माधुरी म्हणाली 'मी सुरुवातीपासून कामात इतकी व्यस्त होते की पैशांकडे लक्ष द्यायलाही वेळ नव्हता. माझे सर्व आर्थिक व्यवहार माझे वडील सांभाळायचे. मला फक्त अभिनय आणि काम यांचीच चिंता असायची.' म्हणजे बॉलिवूडची टॉप अभिनेत्री असूनही, आर्थिक व्यवस्थापनाबद्दल तिला जवळजवळ काहीच ज्ञान नव्हतं.

माधुरीचे पती डॉ. नेने वैद्यकीय क्षेत्रात असले तरी त्यांना फायनान्स, गुंतवणूक आणि आर्थिक नियोजन याचं उत्तम ज्ञान आहे. याचाच फायदा माधुरीला झाला. ती पुढे म्हणाली 'लग्नानंतर मला पैशांची किंमत खऱ्या अर्थाने कळली. कुठे पैसे गुंतवायचे, कंपन्या कशा समजून घ्यायच्या, मार्केट कसं वाचायचं हे सगळं मी डॉ. नेने यांच्याकडून शिकलं.' दिवसभर शूटिंगमध्ये व्यस्त राहणारी आणि पैशांच्या हिशोबापासून दूर असलेली माधुरी, अचानक investements, future Planning आणि financial discipline शिकू लागली. डॉ.नेने यांनी तिला long-term investment, risk management, savings, mutual funds, tax Planning यांचेही धडे दिले. एकेकाळी करोडो कमावणारी पण स्वतः च्या पैशांचा नीट हिशोब न ठेवणारी माधुरी, आता आर्थिक व्यवहारांबद्दल तितकीच जागरूक आणि आत्मविश्वासपूर्ण आहे. ती म्हणते 'लग्नानंतर माझं आयुष्य बदललं. आर्थिक शिस्त शिकली आणि स्वावलंबी कसं व्हायचं हे कळलं. नवऱ्याच्या मार्गदर्शनाने मला प्रचंड मदत झाली.'

# धुरंधर चित्रपटाच्या वादावर प्रसिद्ध अभिनेत्याची प्रतिक्रिया

**मुंबई : आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' हा चित्रपट सध्या चांगलाच गाजत आहे. या स्पाय ॲक्शन थ्रिलर चित्रपटात उत्कृष्ट कलाकार आहेत. ज्यांनी त्यांच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. चित्रपटगृहे भरलेली आहेत आणि बॉक्स ऑफिसवर धुरंधरची प्रचंड कमाई सुरु आहे.**




५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला 'धुरंधर'ने केवळ बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. काही जण या चित्रपटावर टीका देखील करत आहेत, तर काही जण याला इस्लामोफोबिक म्हणत आहेत. अभिनेता गौरव गेराने आता धुरंधरवरील टीकेवर प्रतिक्रिया दिली आहे. चित्रपटात गौरव गुप्तहेर आणि स्पाय मोहम्मद आलमची भूमिका साकारत आहे. झूमशी झालेल्या मुलाखतीत त्यांनी धुरंधरबद्दल सुरु असलेल्या वादावर आपले मौन सोडले आणि लोकांना प्रथम चित्रपट पाहण्याचे आणि नंतर त्याचे मत मांडण्याचे आवाहन केले. तो म्हणाला, 'मी त्या लोकांना फक्त हे सांगू इच्छितो की कृपया आधी चित्रपट पाहा. मला एक सोशल मीडिया पोस्ट आठवते त्यामध्ये म्हटले होते की, 'धुरंधरने भारतीय चित्रपटाची नवी सुरुवात आहे. मी ते येथे नमूद करू इच्छितो. असे चित्रपट कधी कधीच येतात आणि आदित्य धर चित्रपटसृष्टीत उत्तम दिग्दर्शकांपैकी एक आहे.

## धुरंधर २ कधी येणार आहे?

धुरंधर २ च्या प्रदर्शनाची तारीख धुरंधरच्या प्रदर्शनासोबतच जाहीर करण्यात आली. तीन महिन्यांनंतर चित्रपटगृहात येणाऱ्या या चित्रपटाच्या सिक्वेलबद्दल गौरव म्हणाला, 'मी तुम्हाला एवढेच आश्वासन देऊ शकतो की धुरंधर २ गोष्टींना एका मोठ्या पातळीवर घेऊन जाईल.'' १९ मार्च २०२६ रोजी प्रदर्शित होणारा धुरंधर २ यश अभिनीत 'टॉक्सिक' चित्रपटाशी टक्कर देईल. गौरव म्हणाला की एक चांगला चित्रपट नेहमी स्वतःचा प्रेक्षक निर्माण करतो.

# तारक मेहता का उल्टा चश्माला आठवड्यात दुसरा धक्का

**मुंबई : टीव्ही प्रेमींना दर आठवड्याला सर्वाधिक प्रतीक्षा असते ती टीआरपी लिस्टची. ४८व्या आठवड्याची टीआरपी रेटिंग जाहीर झाली असून टॉप १० मालिकांमध्ये काही बदल पाहायला मिळत आहेत. काही मालिकांची टीआरपी घसरली आहे तर काहींनी टॉप ५ मध्ये दमदार एन्ट्री घेतली आहे. चला तर जाणून घेऊया कोणती मालिका कोणत्या नंबरवर आहे.जसा प्रत्येक आठवड्यात असतो तसाच या आठवड्यातही रुपाली गांगुलीच्या 'अनुपमा' ने टीआरपी लिस्टमध्ये नंबर १ वर आपलं स्थान कायम ठेवलं आहे. बऱ्याच काळापासून ही मालिका नंबर वन वर स्थिरावली आहे. प्रेक्षकांना मालिकांमधील नवनवीन ट्विस्ट आणि इमोशनल ड्रामा खूप आवडत असून याला २.१ मिलियन इम्प्रेशन मिळाले आहेत.**



या आठवड्यातही 'क्योंकि सास भी कभी बहू थी' ने दुसऱ्या क्रमांकावर आपली जागा कायम राखली आहे. लवकरच या मालिकेमध्ये ६ वर्षांचा लीप दाखवला जाणार आहे. तुलसीला मिहिरने दिलेल्या धोख्याचा खुलासा होणार असल्याने मोठा ड्रामा रंगणार आहे. या मालिकेला १.९ मिलियन इम्प्रेशन मिळाले आहेत.

या आठवड्यात 'गंगा माई की बेटियां' ने दमदार कामगिरी करत नंबर ३ वर स्थान मिळवलं आहे. या मालिकेला १.८ मिलियन इम्प्रेशन मिळाले आहे.

**टॉप ५ मध्ये चार मालिकांची टक्कर**

नंबर ४ : उड़ने की आशा - सपनों का सफर मालिकेला १.८ मिलियन इम्प्रेशन मिळाले आहेत.

नंबर ५ : तुम से तुम तक (शरद केलकरची मालिका) या मालिकेलाही १.८ मिलियन इम्प्रेशन मिळालं आहे.

नंबर ६ वर 'वसुंधा'- या मालिकेलाही १.८ मिलियन इम्प्रेशन मिळत थोडक्यात टॉप ५ च्या बाहेर राहावं लागलं.

'तारक मेहता का उल्टा चश्मा'ची घसरण - सातवा क्रमांक. लोकप्रिय कॉमेडी मालिका 'तारक मेहताः' यावेळी टॉप ५ मधून बाहेर पडली आहे. मालिकेला १.७ मिलियन इम्प्रेशन मिळत सातवा क्रमांक मिळाला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आधुनिक संसाधनाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत शासकीय सेवा पोहोचवा- जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

आजच्या युगात कृत्रिम बुद्धीमत्ता, समाजमाध्यमांसारख्या आधुनिक संसाधनांचा प्रभावी वापर सुरु आहे. या आधुनिक संसाधनाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या योजना, उपक्रम आणि सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले. बुलढाणा जिल्ह्यात १९ ते २५ डिसेंबर या कालावधीत सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांची कार्यशाळा मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, मुख्य वनसंरक्षक सरोज गवस, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड व इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, आपल्या विभागाच्या प्रशासकीय कामकाजात अमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आत्मनिर्भर होवून सकारात्मक दृष्टीकोण बाळगणे गरजेचे आहे. तसेच कामकाजात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, प्रभावीपणा, पारदर्शकता, कालबद्धता आणि कमी खर्चिक व सहज उपलब्ध होईल अशा कार्यपद्धतीचा अवलंब करावा. नव्या बदलांचा स्वीकार




करुन स्मार्ट काम करावे. संविधानानुसार शासकीय सेवांबाबत नागरिकांचा हक्क आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात सर्वसमावेशकता असली पाहिजे. यासोबतच नागरिकांच्या तक्रारी निकाली काढाव्यात, निरंतर शाश्वत विकासाच्या दृष्टीने काम करावे, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी प्रशासनातील कामकाज पद्धतीविषयी मार्गदर्शन केले. प्रशासनात काम करतांना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चांगल्या भावनेने व सकारात्मक दृष्टीने काम करावे. नागरिकांप्रती मदतीची भावना ठेवा, आपण लोकांच्या सेवेसाठी आहोत यांची जाणीव ठेवून काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या कार्यशाळेत उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी जिल्हा प्रशासनाने विकसित केलेल्या सहज प्रणाली, सुलभ सेवा चॅटबॉट, जिल्हा संकेतस्थळांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# फौजदारी प्रकरणात शिक्षक निलंबित!

जनसंचलन/मोताळा

फौजदारी गुन्ह्यात अटक झालेल्या जिल्हा परिषदेच्या एका शिक्षकावर गटविकास अधिकाऱ्यांकडून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. संबंधित आदेश सोमवारी (दि. २२) काढण्यात आला. जिल्हा परिषदेच्या शाळेत सहाय्यक मोताळा तालुक्यातील अंत्री येथील शिक्षक म्हणून कार्यरत असलेले शांताराम आत्माराम चव्हाण यांच्याविरुद्ध १४ नोव्हेंबरला फौजदारी गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात त्यांना १९ नोव्हेंबरला अटक करण्यात आली. त्यानंतर ३ डिसेंबरला जिल्हा सत्र न्यायालयाने त्यांची जामिनावर सुटका केली. दरम्यान, अटक झाल्यामुळे प्रशासनाची प्रतिमा मलीन झाल्याचा ठपका ठेवत संबंधित शिक्षकाने




महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, ३ चा भंग केल्याचे नमूद करण्यात आले आहे. या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी प्रदान केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारांचा वापर करून गटविकास अधिकारी अशोक काळे यांनी शांताराम चव्हाण यांना १९ नोव्हेंबरपासून सहाय्यक शिक्षक पदावरून निलंबित केले आहे. निलंबन आदेश सोमवारी अधिकृतरीत्या निर्गमित करण्यात आला आहे.

## शेतकरी आत्महत्याग्रस्त प्रकरणातील अपात्र शेतकऱ्यांची माहिती देण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाची टाळाटाळ

जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रीय शेतकरी दिनी बुलढाणा जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रकरणातील अपात्र शेतकऱ्यांची माहिती देण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाची टाळाटाळ .माहिती अधिकारातही केवळ पात्र लाभार्थ्यांची माहिती देऊन अपात्र लाभार्थ्यांची माहिती दडवल्या प्रकरणी नैसर्गिक विभागातील जन माहिती अधिकारी पी करे यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यासंदर्भात अपिलार्थींची मागणीभारत हा एक कृषीप्रधान देश आहे. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे. तो देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्याच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी २३ डिसेंबर हा राष्ट्रीय शेतकरी दिन अथवा किसान दिवस ( ) साजरा केला जातो. बुलढाणा जिल्ह्यामध्ये सन २००६ पासून आज पर्यंत झालेल्या शेतकरी आत्महत्या च्या संदर्भात पात्र आणि अपात्र शेतकऱ्यांची यादी आरटीआय कार्यकर्ते विलास खंडेराव यांनी बुलढाणा येथील जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती विभागात माहितीच्या अधिकार कायद्याखाली माहिती मागितली होती यामध्ये त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीच्या तपशील विषयांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सण २००६ पासून आज पर्यंत शेतकरी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नोद जिल्हाधिकारी कार्यालयस प्राप्त झालेले प्रस्तावतील



पात्र आणि अपात्र (मंजूर आणि नामंजुर ) यादीसह प्रस्तावाची सप्रतची मागणी माहिती अधिकार अंतर्गत केली होती या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी पी के करे यांनी केवळ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पात्र झालेल्या शेतकऱ्यांची अधवट यादी दिली .. तर अपात्र शेतकऱ्यांची यादी देण्यास दिली नाही अपात्र शेतकऱ्यांची यादी जिल्हा प्रशासन का लपून ठेवत आहे ? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे .. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची भेट सुद्धा घेतली असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तर दिले त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या यादीमध्ये मोठा घोळ असल्याची शक्यता सामाजिक कार्यकर्ते व आरटीआय अर्ज करते विलास खंडेराव यांनी व्यक्त केली आहे याकडे शेतकरी नेत्यांसह लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटलं आहे शिवाय त्यांनी या अर्धवट माहिती दिल्या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांच्या विरुद्ध शिस्तभंग कारवाई संदर्भात त्यांनी अपील दाखल केली आहे

# वसाडी प्राथमिक आरोग्य केंद्र प्रकरणाची चौकशी पूर्ण; औषध विल्हेवाटीत त्रुटी आढळल्याने संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस

जनसंचलन/बुलढाणा

प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे मुदतबाह्य नसलेली औषधे जाळल्याचे तसेच वैद्यकीय अधिकारी अनुपस्थिती प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रत्यक्ष भेट देऊन सखोल व वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात आली. या प्रकरणी संबंधित तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व औषध निर्माण अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी दिली. प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे मुदतबाह्य नसलेली औषधे जाळण्यात आल्याचा तसेच वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असल्याचा आरोप करणारी बातमी प्रसारित झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी येथे भेट देऊन सखोल व वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात आली. चौकशीत असे आढळून आले की, प्राथमिक आरोग्य केंद्र वसाडी हे मार्च २०२४ पासून कार्यरत असून मंजूर १५ पदांपैकी २ वैद्यकीय अधिकारी कंत्राटी स्वरूपात कार्यरत आहेत व ८ पदे बाह्य स्रोताद्वारे भरलेली आहेत. काही पदे सध्या रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी सोनाळा येथे वास्तव्यास असून वसाडी येथे निवासाची सुविधा उपलब्ध नाही. ई-औषधी लॉगिन उपलब्ध नसल्यामुळे औषध पुरवठा प्राथमिक आरोग्य केंद्र सोनाळा येथून ऑफलाईन पद्धतीने करण्यात येत आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण ५,४१७ बाह्यरुग्णांनी उपचार घेतले आहेत. चौकशीदरम्यान गोळ्या इंजेक्शन तसेच सिरप ही औषधे




जाळण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर औषधांची एकूण किंमत २ हजार ५३२ रुपये असून त्यापैकी फक्त १६० रुपये किंमतीची औषधे मुदतबाह्य होती. उर्वरित औषधांच्या विल्हेवाट प्रकरणी संबंधित औषध निर्माण अधिकाऱ्याकडून रक्कम वसूल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणी संबंधित तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व औषध निर्माण अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून प्राप्त खुलाशांच्या आधारे पुढील प्रशासकीय कारवाई प्रस्तावित आहे. भविष्यात अशा प्रकारची चूक आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच तालुकास्तरावरील नियंत्रणाबाबत वरिष्ठ स्तरावर आवश्यक ती कारवाई प्रस्तावित आहे. औषध विल्हेवाट प्रक्रियेमध्ये त्रुटी व नियंत्रणाचा अभाव आढळून आल्याने संबंधित अधिकाऱ्यांना सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून प्रशासकीय कारवाई सुरू आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी दिली आहे.

# राज्यात रस्ता अपघातांतील मृत्युदरात घट...

## परिवहन विभागाच्या उपाययोजनांना यश

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्र राज्यात रस्ता सुरक्षेसाठी परिवहन विभागामार्फत सातत्याने राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून, नोव्हेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यातील रस्ता अपघातांमधील मृत्युदरात घट नोंदविण्यात आली आहे.जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यात एकूण ३३,००२ अपघात झाले असून, त्यामध्ये १४,०६६ अपघाती मृत्यू झाले आहेत. मागील वर्षी याच कालावधीत ३२,७८४ अपघातांत १४,१८५ मृत्यू झाले होते. तुलनात्मक पाहता, अपघातांची संख्या २१८ ने (०.६६ टक्के) वाढली असली तरी अपघाती मृत्यूंची संख्या ११९ ने म्हणजेच ०.८३ टक्क्यांनी घटली आहे. मृत्युदरातील ही घट रस्ता सुरक्षा उपाययोजनांचे यश दाखवते.दरम्यान, मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरही अपघाती मृत्यूंमध्ये मोठी घट नोंदविण्यात आली आहे. जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत या मार्गावर ८२ अपघाती मृत्यू झाले होते, तर २०२५ मध्ये ही संख्या ६१ वर आली आहे.म्हणजेच २१ मृत्यूंनी (२६ टक्के) घट झाली आहे. तसेच अपघातांची संख्या ६६ वरून ५४ इतकी कमी झाली असून, त्यामध्ये १८ टक्के घट नोंदविण्यात आली आहे.रस्ता सुरक्षा उपायांमुळे काही जिल्ह्यांमध्ये मृत्यूंच्या संख्येत विशेष घट दिसून आली आहे. नागपूर शहरात २१ टक्के, पालघरमध्ये २० टक्के, अमरावतीत १७ टक्के, पुण्यात १५ टक्के, धुळ्यात १४ टक्के तर छत्रपती संभाजीनगरमध्ये १२ टक्क्यांनी अपघाती मृत्यू कमी झाले आहेत, असे




परिवहन विभागाने कळविले आहे. राज्यातील रस्ता अपघातांची संख्या सन २०३० पर्यंत ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट परिवहन विभागाने निश्चित केले असून, त्यासाठी भविष्यात रस्ता सुरक्षा उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. याचबरोबर, राज्यातील सर्व वाहनचालक व पादचारी नागरिकांनी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत,असे आवाहनही परिवहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात डिजिटल जनगणनेसाठी अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सुरू...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा प्रशासनाच्या वतीने जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने डिजिटल जनगणना व घर यादी गट यादी तयार करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. या जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीसाठी जिल्हास्तरावर सहायक संचालक प्रविण भगत व सांख्यिकी अन्वेषणचे अरुण साळगांवकर यांची बुलढाणा जिल्हासाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने दि. २२ डिसेंबर रोजी नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षणास जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सदाशिव शेलार यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तहसीलदार तथा चार्ज अधिकारी




(ग्रामीण), त्यांचे जनगणना संबंधित नायब तहसीलदार, लिपीक, मंडळ अधिकारी, तसेच सर्व मुख्याधिकारी व चार्ज अधिकारी (शहरी), त्यांचे जनगणना संबंधित अधिकारी-कर्मचारी, सहाय्यक संचालक नगर रचना, बुलढाणा आणि सर्व गट विकास अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर सहाय्यक संचालक प्रविण भगत व सांख्यिकी निरीक्षक अरुण साळगांवकर यांनी डिजिटल जनगणना, घर यादी गट यादी निर्मिती, कामकाजाची पद्धत, जबाबदाऱ्या व नियोजन याबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांच्या अडचणी व प्रश्न जाणून घेऊन त्यावर तात्काळ मार्गदर्शन व निराकरण करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे जनगणना २०२७ ची पूर्वतयारी अधिक सक्षम, नियोजनबद्ध व डिजिटल स्वरूपात राबविण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## जि. प. उर्दू प्राथमिक शाळा डोणगावच्या विद्यार्थिनीचे सुयश;

### मंताषा शेख हिने तोंडपाठ सांगितले राज्य मंत्रिमंडळ

**जनसंचलन/ डोणगाव**

येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक मुलांची शाळा, डोणगाव येथील इयत्ता चौथी ब मधील विद्यार्थिनी मंताषा शेख सलीम हिने आपल्या अफाट स्मरणशक्तीच्या जोरावर महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांची नावे उर्दू भाषेतून पाठ करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मंताषा हिने अत्यंत कमी वेळात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्व कॅबिनेट मंत्र्यांची नावे पदनामासह उर्दूमध्ये तोंडपाठ केली आणि ती लिहूनही दाखवली. तिच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षक वृंद, मुख्याध्यापक आणि शिक्षणप्रेमींकडून तिचे कौतुक होत आहे. एका लहान वयोगटातील मुलीने राजकीय घडामोडी आणि प्रशासकीय माहिती इतक्या अचूकपणे आत्मसात केल्यामुळे तिचे



सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. तिच्या या यशात शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांचे हे उत्तम उदाहरण असल्याचे बोलले जात आहे. मंताषाच्या या कामगिरीबद्दल ग्रामस्थांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे.

# निकालांनी दिला ट्रेंड बदलाचा इशारा काँग्रेसची पकड सैल!

## भाजपचा शहरी धक्का समीकरणे बदलाची नांदी !




**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत काँग्रेसचा दबदबा नेहमीच थेट किंवा आघाड्यांच्या माध्यमातून दिसत आला आहे; मात्र गेल्या काही वर्षांत ग्रामीण-शहरी राजकारणाची नाळ वेगळ्या दिशेने वळत असल्याचे सातत्याने संकेत मिळत होते. २०१७ च्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांत राज्यभर भाजपने मोठी भरारी घेतली आणि अनेक जिल्ह्यांत बुलढाण्यातही त्या काळात काँग्रेसच्या पारंपरिक पकडीला सत्ताकेंद्रे बदलली. धक्का त्या बसल्याची चर्चा होती. आता नगरपालिकांच्या निकालांत झटक्याची जणू पुनरावृत्ती होत असल्याचे चित्र दिसत आहे. तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या जिल्ह्यातील ११ नगरपालिकांच्या निवडणुकांनी राजकीय ध्रुवीकरणात बदलाचे संकेत दिले आहेत. उपलब्ध आकडेवारीनुसार, २०१७ मध्ये काँग्रेसचे ८३ नगरसेवक होते, तर २०२५ मध्ये ही संख्या ६० वर आली, म्हणजेच ३८ टक्के घट ! भाजपचे संख्याबळ मात्र ७२ वरून ८९ वर पोहोचले, म्हणजे गतवेळच्या तुलनेत २३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अध्यक्षपदांच्या पातळीवरही मिश्र, पण २०१७ च्या तुलनेत वाढल्या महत्त्वाचा संदेश दिसतो. काही नगरपालिकांत काँग्रेसने बाजी मारली, तर काही ठिकाणी विरोधी आघाड्यांनी भाजपचा स्वीप रोखला. तरीही एकूण चित्रात भाजपने अनेक ठिकाणी वरचष्मा राखल्याचे दिसते. यावेळी जागांची एकूण संख्या वाढून स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे. मागील वेळी प्रमुख पक्षांना २६७ जागा मिळाल्या होत्या, तर यावेळी २८६ जागा मिळाल्या. वाढलेल्या राजकीय स्पर्धेत भाजपचा फायदा आणि काँग्रेसची पीछेहाट ठळक ठरते. परिणामी, काँग्रेस नंबर वन ही जुनी धारणा शहरी पट्ट्यात ढासळते आहे का, आणि जिल्हा परिषदेत दिसलेली हवा पालिकांतही स्थिरावते आहे का, हा प्रश्न आता अधिक ठळकपणे पुढे आला आहे. सध्या भाजपने चार पालिकांमध्ये नगराध्यक्षपद मिळवले आहे, तर काँग्रेसला तीन ठिकाणी नगराध्यक्षपद मिळाले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८